# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.


---

(प्रसिद्धिपत्रक) दि. २४ नोव्हेंबर २०२१

## राज्यातील १०५ नगरपंचायतींसाठी २१ डिसेंबरला मतदान

मुंबई, दि. २४ (रानिआ): विविध ३२ जिल्ह्यांतील १०५ नगरपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी २१ डिसेंबर २०२१ रोजी मतदान तर; २२ डिसेंबर २०२१ मतमोजणी होईल. त्यासाठी संबंधित नगरपंचायतींच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, अशी घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज येथे केली.

श्री. मदान यांनी सांगितले की, राज्यातील एप्रिल २०२० ते मे २०२१ या कालावधीत मुदत संपलेल्या ८१ आणि डिसेंबर २०२१ मध्ये मुदत संपणाऱ्या १८; तसेच नवनिर्मित ६ अशा एकूण १०५ नगरपंचायतींच्या प्रत्येकी १७ सदस्यपदांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदान होईल. त्यासाठी १ ते ७ डिसेंबर २०२१ या कालावधीत नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येतील. ४ व ५ डिसेंबर २०२१ रोजी सुट्टी असल्याने नामनिर्देशनपत्रे स्वीकारण्यात येणार नाहीत. नामनिर्देशनपत्रांची छाननी ८ डिसेंबर २०२१ रोजी होईल. मतदान २१ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० पर्यंत असेल. २२ डिसेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणी सुरू होईल.

राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना नामनिर्देशनपत्रासोबत जात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्याचबरोबर कोविड-१९ संदर्भात केंद्र व राज्य शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार व आवश्यक त्या उपाययोजना करून या निवडणुकांचा कार्यक्रम राबवावा. त्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने १५ डिसेंबर २०२० रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार कार्यवाही करावी, असेही निर्देश संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत, अशी माहितीही श्री. मदान यांनी दिली.

**सार्वत्रिक निवडणूक होत असलेल्या नगरपंचायतींची जिल्हानिहाय नावे: ठाणे-** मुरबाड व शहापूर, **पालघर-** तलासरी, विक्रमगड, मोखाडा, **रायगड-** खालापूर, तळा, माणगाव, म्हसळा, पोलादपूर, पाली (नवनिर्मित), **रत्नागिरी-** मंडणगड, दापोली, **सिंधुदुर्ग-** कसई-दोडामार्ग, वाभवे-वैभववाडी, कुडाळ, **पुणे-** देहू (नवनिर्मित), **सातारा-** लोणंद, कोरेगाव, पाटण, वडूज, खंडाळा, दहीवडी, **सांगली-** कडेगाव, खानापूर, कवठे-महाकाळ, **सोलापूर-** माढा, माळशिरस, महाळूंग-श्रीपूर (नवनिर्मित), वैराग (नवनिर्मित), नातेपुते (नवनिर्मित), **नाशिक-** निफाड, पेठ, देवळा, कळवण, सुरगाणा, **धुळे-** साक्री, **नंदुरबार-** धडगाव-वडफळ्या-रोषणमाळ, **अहमदनगर-** अकोले, कर्जत, पारनेर, शिर्डी, **जळगाव-** बोदवड, **औरंगाबाद-** सोयगाव, **जालना-** बदनापूर, जाफ्राबाद, मंठा, घनसावंगी, तीर्थपुरी (नवनिर्मित), **परभणी-** पालम, **बीड-** केज, शिरूर-कासार, वडवणी, पाटोदा, आष्टी, **लातूर-** जळकोट, चाकूर, देवणी, शिरूर-अनंतपाळ, **उस्मानाबाद-** वाशी, लोहारा बु., **नांदेड-** नायगाव, अर्धापूर, माहूर, **हिंगोली-** सेनगाव, औंढा-नागनाथ, **अमरावती-** भातकुली, तिवसा, **बुलडाणा-** संग्रामपूर, मोताळा, **यवतमाळ-** महागाव, कळंब, बाभुळगाव, राळेगाव, मारेगाव, झरी जामणी, **वाशीम-** मानोरा, **नागपूर-** हिंगणा, कुही, **वर्धा-** कारंजा, आष्टी, सेलू, समुद्रपूर, **भंडारा-** मोहाडी, लाखनी, लाखांदूर, **गोंदिया-** सडकअर्जुनी, अर्जुनी, देवरी, सावली, **चंद्रपूर-** पोंभुर्णा, गोंडपिपरी, कोरपना, जिवती, सिंदेवाही-लोनवाही, मुलचेरा, **गडचिरोली-** एटापल्ली, कोरची, अहेरी, चामोर्शी, सिरोंचा, धानोरा, कुरखेडा आणि भामरागड.

**पोटनिवडणुकांसाठीही मतदान**

विविध जिल्ह्यातील सात नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या रिक्त जागांसाठीदेखील २१ डिसेंबर २०२१ रोजी मतदान होणार आहे. शिरोळ (६ अ), नागभीड (४ अ), जत (५ ब), सिल्लोड (१२ अ), फुलंब्री (२ आणि ८), वानाडोंगरी ( ६ अ) आणि ढाणकी (१२ आण १३) या नगरपरिषद/ नगरपंचायतींतील सदस्यपदांच्या रिक्तपदांसाठी या पोटनिवडणुका होत आहे.

0-0-0

(Jagdish More, SEC)